# झोपुप्रा, पुणे अंतर्गत येणा-या सर्व झोपडपट्ट्यावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील नोंदणीबाबतची कार्यपध्दती

- **सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीचे उद्देश :-**
  १) पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील सर्व घोषित झोपडपट्टीतील झोपडपट्टी धारकांना प्राधिकारणाच्या / शासनाच्या धोरणानुसार हक्काची पक्की घरे उपलब्ध करुन देणे.
  २) झोपडपट्टीधारक,विकसक तसेच प्राधिकरण यांचे समन्वयाने पुनर्वसन योजनेचा योग्य प्रचार करुन जलद गतीने पुर्ण करण्याकरीता प्रयत्न करणे.
  ३) संस्थेच्या मालमत्तेचे व्यवस्थापन,देखभाल व प्रशासन करणे.
  ४) झोपडपट्टीधारक सभासद,समिती सदस्य,पदाधिकारी कर्मचारी यांच्यामध्ये सहकारी कौशल्य वृध्दिंगत करणे,सभासदांच्या करीता सामाजीक,शैक्षणिक,सांस्कृतीक मनोरंजनात्मक कार्यक्रम करणे
  ५) संस्थेच्या उद्देशपुर्तीसाठी कार्य करणे.

- **सहकारी गृहनिर्माण संस्था निर्मीतीचे फायदे :-**
  १) झोपडपट्टी धारकांचा पुनर्वसन योजना प्रस्ताव दाखल करण्याचा अधिकार.
  २) पुनर्वसन योजनेसंबंधी सल्ला,मार्गदर्शन,समन्वय साधून योजना मुदतीमध्ये विना अडथळा पुर्ण करण्यात मदत होणार.
  ३) सहकारी संस्थेच्यामाध्यमातून योजनेचे सर्वेक्षण,झोपडपट्टी धारकांची पात्रता निश्चित करण्यासाठी आवश्यक माहिती / कागदपत्रे संकलीत करणे प्रशासनास मदत करणे.
  ४) सहकारी संस्था नोंदणी नंतर अभिहस्तांतरणाव्दारे जागेचे मालकी हक्क मिळण्याचा अधिकार.
  ५) सभासदांमध्ये सहकाराची भावना वृध्दीगंत करुन व्यक्तीगत तक्रारीचे संस्था स्तरावर निराकरण करण्यास मदत होते.

- **सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करीता आवश्यक कागदपत्रांची उपलब्धता :-**
  सहकारी गृहनिर्माण संस्थानोंदणी करीता लागणारे आवश्यक फॉर्मस,परिशिष्टे,उपविधी इ.कागदपत्रे सहकार विभागाचे संकेत स्थळ http://sahakarayukta.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.

- **सहकार नोंदणी प्रस्ताव कोण दाखल करु शकेल :-**
  घोषीत झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील पात्र झोपडीधारक किंवा पुनर्वसन योजनेचा विकसक यांनी सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीचा प्रस्ताव सहकार विभागाकडे दाखल करणे आवश्यक आहे.

- **सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीच्या अनुषंगाने आवश्यक बाबींची माहिती:-**
  १) सदर संस्थांची नोंदणी ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्या अंतर्गतचे नियम १९६१ मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

२) झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील पुनर्वसन घटक इमारत,तसेच मुक्त विक्री घटक (इमारत असल्यास) त्याची नोंदणी सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झोपुप्रा,पुणे यांचेकडे करणे आवश्यक आहे.

३) प्रस्ताव सादर करण्यात आलेल्या नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे कार्यक्षेत्र हे संबंधित सर्व्हेक्रमांक व योजना क्षेत्रापुरते मर्यादीत राहील.

४) नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या प्रस्तावावर संस्थेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम प्राधिकारी,झोपुप्रा,पुणे यांचेकडून पात्र केलेल्या किमान ५१ टक्के झोपडीधारकांनी सभासदत्वासाठी स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

- **संस्था नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे खालीलप्रमाणे:-**

१) सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी करिता मा.सहकार आयुक्त व निबंधक,सहकारी संस्था,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक दि.२९/११/२०१० नुसार सर्व कागदपत्रे (आवश्यक फेरबदलासह) नोंदणी प्रस्तावसोबत संलग्न असणे आवश्यक राहील.

२) झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत करण्यात आले आहे त्या राजपत्राची प्रत तसेच प्राधिकरणाने कलम ३ क अन्वये निर्गमीत केलेल्या आदेशाची प्रत.

३) योजना क्षेत्रावर राहणाऱ्या पात्र झोपडीधारकांची यादी (परिशिष्ट-२).

४) संबंधीत झोपडीधारक नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या कार्यक्षेत्रात राहत असलेबाबतचा पुरावा याकरीता रहिवासी दाखला,आधारकार्ड इ.कागदपत्रांची स्व-साक्षांकित प्रत.

५) सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीकरिता आवश्यक असणाऱ्या सहभागीदारी गृहरचना संस्थेच्या उपविधीच्या दोन प्रती.

६) रुपये १००/- चे नॉन ज्युडीशियल स्टॅम्पेपरवर मुख्य प्रवर्तक यांचे नमुना “वाय” आणि नमुना “झेड” मधील प्रतिज्ञापत्र

७) झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संबंधीत योज नेविषयी निर्गमीत केलेल्या आदेशांच्या प्रती.

- **सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीची कार्यपध्दती / महत्वाचे टप्पे :-**

१) सहकारी गृह निर्माण संस्थेचा नाव आरक्षण व सहकारी बँकेत खाते उघडण्याचा परिपूर्ण प्रस्ताव नोंदणी पुर्व प्राथिमक सभेच्या इतिवृ त्तासह सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झोपुप्रा यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर सदरील प्रस्तावाची छाननी सहकार कायदा, शासन परिपत्रके व झोपुप्रा कडील परिपत्रकानुसार करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५४ ब-३ नुसार १ महिन्याचे कालावधीमध्ये परवानगी देण्या ची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.

२) नियोजित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मुख्य प्रवर्तक यांनी सभासद भाग-भांडवल (प्रत्येकी रु.५००/-) व प्रवेश फी (प्रत्येकी रु.१००/-) प्रमाणे रक्कम बँक खात्यावर भरणा

करुन बँक शिल्केच्या प्रमाणपत्रासह परिपुर्ण नोंदणी प्रस्ताव दाखल केल्यानंतर रु पये २,५००/- रकमेचे सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणी शुल्काचे चलन मंजूर करुन देण्यात येईल.

३) नोंदणी शुल्क शासकीय कोषागारात भरणा करुन चलन सहकार विभागाकडे सादर केल्यानंतर प्रस्तावाची छाननी करुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम १५४ ब - २ व ३ नुसार १ महिन्याचे कालावधीमध्ये सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीची कार्यवाही पुर्ण करण्यात येईल.